# मिरा भाईंदर महानगरपालिका

उप. आयुक्त (सार्व. आ.) यांचे कार्यालय.
जा.क्र.मनपा/उप.आयुक्त/१०२/२०२३-२४
दि. २४ /०७/२०२३

## // आदेश //

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व खाजगी रुग्णालये, नर्सिंग होम, क्लिनिक, डायग्नोस्टीक सेंटर, सोनोग्राफी सेंटर, पॅथोलॉजी लॅबोरेटरी, इ. आस्थापना यांना देण्यात येणाऱ्या नोंदणी व नुतनीकरण परवानगी बाबत.**

**संदर्भ : मा. आयुक्त महोदय यांची दि. २४/०७/२०२३ रोजीची मान्यता.**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी रुग्णालये, नर्सिंग होम यांना "बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन अॅक्ट, १९४९" व "महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम, २०२१" अन्वये तसेच क्लिनिक, डायग्नोस्टीक सेंटर, सोनोग्राफी सेंटर, पॅथोलॉजी लॅबोरेटरी, इ. आस्थापना यांना "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ३८६" अन्वये नोंदणी व नुतनीकरण परवानगी देण्यात येते. सदर नोंदणी व नुतनीकरण परवानगी देताना प्रशासकीय नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याने मा. आयुक्त यांच्या संदर्भिय मान्यतेन्वये उपायुक्त (सार्व. आरोग्य) यांच्या पूर्व मान्यतेने वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचेमार्फत खाजगी रुग्णालये, नर्सिंग होम यांना नोंदणी व नुतनीकरण करण्यास मंजुरी दिलेली आहे.

त्याअन्वये खाजगी रुग्णालये, नर्सिंग होम यांना "बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन अॅक्ट, १९४९" व "महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम, २०२१" अन्वये तसेच क्लिनिक, डायग्नोस्टीक सेंटर, सोनोग्राफी सेंटर, पॅथोलॉजी लॅबोरेटरी, इ. आस्थापना यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ३८६ अन्वये परवानगी देताना उपायुक्त (सार्व. आरोग्य) यांच्या पूर्व मान्यतेने परवानगी देण्याची कार्यवाही करणेत यावी.

24/7

(संजय शिंदे)
उपायुक्त (सार्व. आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव :
वैद्यकीय आरोग्य अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका